अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०६/०६/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २०/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. सरबजीतसिंह करतारसिंह बाजवा, स्वच्छता निरीक्षक, सार्वजनिक आरोग्य खाते, एच/पुर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रुझ, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ५,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. २,००,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची खाजगी कंपनी असून नमूद कंपनीद्वारे व्यावसायीकांना हेल्थ लायसन्स, इमारत परवानगी व इतर सरकारी कार्यालयात आवश्यक परवानगी काढून देण्याकरीता कन्सलटंटचे काम केले जाते. तक्रारदार यांचे सांताक्रुझ येथील क्लाईन्ट त्यांच्या आस्थापनासाठी हेल्थ लायसन्सची आवश्यकता होती. त्यानुसार तक्रारदार यांनी एच/पुर्व विभाग, मनपा, मुंबई येथे जावून लोकसेवक सरबजीतसिंह करतारसिंह बाजवा यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना ऑनलाईन अर्ज करण्यास सांगितले व त्यापुर्वी रू. २,००,०००/- दयावे लागतील असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी ऑनलाईन अर्ज करून लोकसेवक यांना रू. २,००,०००/- दिले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांना ऑनलाईन हेल्थ लायसन्स प्राप्त झाले होते. त्यानंतर लोकसेवक व वैद्यकीय अधिकारी प्रमोद पाटील यांनी तक्रारदार यांचे क्लाईन्ट यांच्या आस्थापनेची पाहणी केली व तक्रारदार यांना ऑनलाईन मिळालेले लायसन्स चुकीचे असून सदरबाबत तक्रारदार यांना कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले. तक्रारदार यांनी एच/पुर्व विभाग, मनपा, मुंबई येथे जावून वैद्यकीय अधिकारी प्रमोद पाटील व सरबजीतसिंह बाजवा यांची भेट घेतली असता, वैद्यकीय अधिकारी पाटील यांनी सदरहू लायसन्स देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ५,००,०००/- लाचेची मागणी करून यापुर्वी रू. २,००,०००/- दिले असल्याने उर्वरीत रू. ३,००,०००/- लाच देण्यास सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १४/०५/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/०५/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक सरबजीतसिंह करतारसिंह बाजवा यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता उर्वरीत रू. ३,००,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २,५०,०००/- लाच स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने दिनांक ०५/०६/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. २,००,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. चंद्रकांत माळी, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** **क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net

Scanned with OKEN Scanner